# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date: 13 April 2025

## Time: 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक: १३ एप्रिल २०२५ दुपारी १.०० वा.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जालियनवाला बाग हत्याकांडातील हुतात्म्यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे. हा आपल्या देशाच्या स्वातंत्र्यपुर्व इतिहासातील एक काळा अध्याय आहे, येणारी प्रत्येक पिढी या बलिदानाचं स्मरण करेल असं, पंतप्रधानांनी आपल्या समाज माध्यमांवरील संदेशात म्हटलं आहे. १०६ वर्षांपुर्वी १३ एप्रिल १९१९ रोजी अमृतसरमधील जलियनवाला बाग इथं अमानुष गोळीबार झाला होता.

****

आज पंजाबमध्ये बैसाखीचा सण उत्सहात साजरा केला जात आहे. या दिवशी खालसा पंथाची स्थापना झाली होती. बैसाखीच्या दिवशी शेतकरी पीकाच्या काढणीला सुरूवात करतात. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना बैसाखीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. हा सण प्रत्येकाच्या मनात एकता, कृतज्ञता आणि नवनिर्माणाची भावना निर्माण करतो असं पंतप्रधानांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

****

राज्य शिक्षण मंडळाच्या फेब्रुवारी–मार्चमध्ये पार पडलेल्या दहावी आणि बारावी परीक्षेसाठी क्रीडा गुण सवलतीचे प्रस्ताव सादर करण्यासाठी २१ तारखेपर्यंत मुदवाढ देण्यात आली आहे. हे प्रस्ताव जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यातर्फे आपले सरकार प्रणालीद्वारे ऑनलाईन पद्धतीने सादर करण्याचं आवाहन शिक्षण मंडळानं केलं आहे.

****

महाराष्ट्राची कुलस्वामिनी तुळजाभवानी मातेच्या चैत्री पौर्णिमा यात्रेस गुढीपाडव्यापासून प्रारंभ झाला आहे. काल चैत्री महिन्याची पौर्णिमा असल्यानं तुळजाभवानी मातेच्या दर्शनासाठी भाविकांची उन्हाच्या कडाक्यातही मोठी गर्दी झाली. पहाटे सहा वाजता अभिषेक पूजा पार पडली तसंच देवीची धुपारती महापूजा करण्यात आली. चैत्री पौर्णिमेनिमित्त देवीच्या गाभाऱ्यात विविध आकर्षक फुलांसह आंब्याची आरास भरून सिंहासनाला आंबे फुलांची सजावट करण्यात आली होती. दरम्यान, येरमाळा इथल्या येडेश्वरी यात्रेलाही काल प्रारंभ झाला, आज येडेश्वरी यात्रा महोत्सवातील चुनखडी वेचण्याचा कार्यक्रम आहे, या निमित्ता भाविकांची मोठी गर्दी झाली आहे.

****

खान्देश कुलस्वामिनी श्री एकवीरा देवीची काल चैत्र पोर्णिमेनिमित्त धुळे शहरातून रथ यात्रा काढण्यात आली. यावेळी खासदार डॉक्टर शोभा बच्छाव यांच्यासह मान्यवरांनी एकवीरा मातेचं आणि रथाचं पूजन केलं.

****

भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या औचित्यानं दादर इथल्या इंदू मिल परिसरातील स्मारक प्रकल्पाचा मुंबई महानगर विकास प्राधिकरण एमएमआरडीएचे आयुक्त डॉक्टर संजय मुखर्जी आणि अतिरिक्त आयुक्त विक्रम कुमार यांनी नुकताच आढावा घेतला. या भव्य स्मारकाशी संबंधित सर्व यंत्रणांना कामातील गती वाढवण्याचे निर्देश त्यांनी दिले. स्मारक वेळेत पूर्ण व्हावं, आणि ते डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या अजरामर कार्याला साजेसं गौरवचिन्ह ठरावं अशी अपेक्षा आयुक्त मुखर्जी यांनी यावेळी व्यक्त केली.

****

भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती दिनानिमित्त माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयाच्या समाजमाध्यमांवरून ‘महापुरुष डॉक्टर आंबेडकर’ या माहितीपटाचं प्रसारण उद्या सकाळी ११ वाजता आणि ‘डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर : द अनटोल्ड ट्रूथ’ या चित्रपटाचं प्रसारण दुपारी १.३० वाजता होणार

आहे. यानंतर अर्ध्या तासानं दुपारी दिड वाजता याच चित्रपटाचं प्रसारण दुरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवरुनही होणार आहे.

****

भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त धाराशिव जिल्हा प्रशासन, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आणि नेहरू युवा केंद्र यांच्या संयुक्त विद्यमानं आज “जय भीम पदयात्रा” काढण्यात आली. पोलिस अधीक्षक संजय जाधव यांच्या हस्ते डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पदयात्रेला सुरुवात झाली. यावेळी राष्ट्रगीत, राज्यगीत आणि भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचं वाचन करण्यात आलं. या पदयात्रेत शालेय तसंच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसह सहभागी झाले होते. पदयात्रेच्या मार्गावर फुले-शाहू-आंबेडकर उद्यान कृती समितीच्यावतीनं विविध महापुरुषांचे देखावे उभारण्यात आले होते.

****

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वडाळा अग्निशमन केंद्राद्वारे काल 'अग्निशमन सेवा सप्ताह'च्या निमित्तानं अग्निसुरक्षा जनजागृती फेरी काढण्यात आली. प्रमुख अग्निशमन अधिकारी रवींद्र अंबुलगेकर यांनी या फेरीला झेंडा दाखवला. मुंबई अग्निशमन दल आणि अग्निसुरक्षेबाबत जनजागृती व्हावी, या हेतूनं ही फेरी काढण्यात आली.

****

हवामान- मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात आज आणि उद्या सोसाट्याचा वारा आणि मेघगर्जनेसह तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. आज आणि उद्या यलो अलर्ट जारी करण्यात आला असून या काळात छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, नांदेड आणि सोलापूर इथं पावसाचा अंदाज आहे. राज्यात काल सर्वाधिक ४२ पूर्णांक आठ अंश सेल्सिअस तापमान अकोला इथं नोंदवलं गेलं. मराठवाड्यात धाराशिव इथं ३९ पूर्णांक चार अंश, छत्रपती संभाजीनगर इथं ३९ पूर्णांक सहा तर परभणी इथं ४१ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली.